# कान्हा श्रृंगार

दुर्वा बिल्वदले फुले नि पाने तुळस रूई आंब्याची
गुंफूनी केली भरदार माळ मी घालण्या तुझ्या गळी
जाळूनी कापुर निरांजनावरी केली तीट काजळी
उगाळिली सुगंधी गंधाची उटी लावण्या तुझ्या भाळी

फिरूनी वनी उपवनी शोधिले मोरपीस छानसे
खोवता तुझ्या दाट केशसंभारी मनोहारी ते दिसे
कळया दोन सोनचफ्याच्या खोचता शोभती कर्णफुले
गजरे जाई जुईचे मनगटी दंडावरी बांधिले

गुंडाळला कंबरेला कडदोरा तलम रेशमाचा
खोचले त्यात सान पान केळीचे लंगोटी नेसवाया
कोवळया गुलाबी कळयांनी विणल्या पायी तुझ्या तोरड्या
घे मुरली आता गोपासंगे जाण्या आहेस तू मोकळा

-नारायण
०९/१२/१६